CB

# TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH, PUNE

## BACHELOR OF COMPUTER APPLICATIONS (B.C.A.)(044)/
## BACHELOR OF SCIENCE(COMPUTER APPLICATIONS-750)
## BACHELOR OF COMPUTER APPLICATIONS (CYBER SECURITY - 464 /
## BCA (DATA SCIENCE AND MACHINE LEARNING - 786)/
## BACHELOR OF SCIENCE (CYBER SECURITY-760)
## EXAMINATION : MAY - 2026
## SEMESTER – II

**Sub: Marathi (BCA23 –210/78625-205/BSC24-208/46425-205/76025-208)**

**दिनांक:** ०२/०६/२०२६ **गुण : ३०** **वेळ : स. १०.०० ते दु. ११.३०**

**सूचना :** १) सर्व प्रश्न सोडवा.
२) उजवीकडील अंक त्या प्रश्नांचे गुण दर्शवितात.
३) उत्तरपत्रिकेत प्रश्नपत्रिकेतील प्रश्नक्रमांक लिहिणे आवश्यक आहे.

**प्रश्न १ खालील प्रश्नांची योग्य पर्याय निवडून उत्तरे द्या. (०५)**

१. ज्या वर्णाचा उच्चार स्वरांचे सहाय्य घेऊन होतो त्यास -------- म्हणतात
अ) स्वरादि ब) वर्ण
क) व्यंजने ड) स्वर

२. वाक्यातील शब्द किंवा संकल्पनेचे स्पष्टीकरण देण्यासाठी कोणते विरामचिन्ह वापरले जाते
अ) अपसरण ब) गोल कंस
क) विसर्ग ड) विकल्प

३. सारलेखकाने मूळ मजकुराशी --------- असावे
अ) विरोधी ब) अनभिज्ञ
क) मतप्रदर्शन करणारे ड) प्रामाणिक

४. चेतन व अचेतन वस्तूंमध्ये स्वतःची कल्पना करून, कोणत्या निबंधप्रकारात निबंध लिहीला जातो?
अ) आत्मनिवेदनपर ब) कल्पनाविलासात्मक
क) चिंतनपर ड) चरित्रात्मक

५. कोणता अर्ज वाचनीय बनतो?
अ) लालित्यपूर्ण ब) आलंकारिक
क) मुद्देसूद ड) काव्यात्मक

**प्रश्न २ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन) (१५)**

१. नोकरी मिळवण्यासाठी केलेल्या अर्जाचा नमुना लिहा.

२. शुद्धलेखन ऱ्हस्व-दीर्घाचे कोणतेही चार नियम लिहा.

३. विसर्ग आणि अपसरण या विरामचिन्हांमधील फरक स्पष्ट करा.

४. वर्णनात्मक निबंधाचे स्वरुप आणि प्रकार थोडक्यात सांगा.

५. सारलेखनाची कोणतेही चार तंत्रे सांगा.

**प्रश्न ३ कोणताही एक प्रश्न सोडवा** **(१०)**

१.

**खालील विषयावर ६०० शब्दांत निबंध लेखन करा.**
**कृत्रीम बुद्धीमत्ता : संधी आणि आव्हाने**

**किंवा**

२. **दिलेल्या उताऱ्याचे १/३ सारांशलेखन करा, उताऱ्यास योग्य शिर्षक द्या.**

वेग हे गतीचे एक रूप आहे. आपले जीवनही स्थिती आणि गती यांत विभागलेले आहे. थांबणे, चालणे, धावणे असे हे जीवनचक्र फिरतच असते. आपल्या विचारांनाही गती असते, जिला आपण प्रगती म्हणतो. ती विचारांची गती असते. गतीला जेव्हा दिशा असते तेव्हाच ती प्रगती या संज्ञेला पात्र ठरते. दिशाविहीन गती ही अधोगती ठरते. आजच्या जीवनात विलक्षण वेगवानता आढळते. रस्ते वाहनांनी व्यापलेले असतात. माणसे घरांत राहतात म्हणूनच अल्पकाळ तरी स्थिर राहतात. एरवी गतीपायी अगतिक होतात. अहोरात्र भरारणारी आणि थरारणारी वाहने पाहिली म्हणजे आश्चर्य वाटते. ही आली कोठून? आली कशी आणि कशासाठी? पूर्वी देशोदेशींचा इतिहास घडला. लोकांनी जगप्रवासही केला; पण आजच्या एवढी अवखळ वाहने कोठे दिसत नसत. आता माणूस घरातून दारात आला, की वाहनावर आरूढ होतो. वेळ थोडा असतो. कामे बरीच असतात. पायी चालत ती उरकता येत नाहीत. जीवन हे दशदिशांना विभागलेले आहे. मुलांची शाळा एका टोकाला, आपले कार्यालय दुसऱ्या टोकाला, मंडई एका बाजूला तर दवाखाना दूर, कुठल्या तरी दिशेला. जीवनाची ही टोके सांधणार कशी? जोडणार कशी? शेवटी गती ही घ्यावीच लागते. यथाप्रमाण गती ही गरज आहे; पण अप्रमाण, अवास्तव आणि अनावश्यक गती ही एक विकृती आहे. आपली कामे यथासांग पार पाडावीत, एवढा वेग जीवनाला असावा. त्यापेक्षा अधिक वेग म्हणजे अक्षम्य आवेग म्हणावा लागेल. तो आत्मघातकी ठरतो.

**किंवा**

३. **खालील उतारा शुद्धलेखनासह, योग्य विरामचिन्हे वापरून पुन्हा लिहा.**

न बोलताही सवाद होणारा सवेदनशील काळ मागं पडून आता खूप बोलूनही काळीज न ओलावणारा काळ आला आहे. कारणं अनेक आहेत पण मला जाणवणारं मूख्य कारण म्हणजे माणूस मिथ्या सोनं सत्य हे तत्वज्ञान आरपार बिंबवलं गेलं आहे 'पैसा मिळवला की माणूस सुखी होतो', हा नीष्कर्ष गरीबीतून येऊ शकतो पण गरिबी दूर करताना दुसरेच एक आंतरिक दारिद्र्य निर्माण होऊ नये याची दक्षता 'मार्केटिंग'च्या भरात घेतली गेली नाही. यांतून संवाद-सुसंवाद प्रेम माया वात्सल्य काय मिळणार भावनेवर का जगता येणार असे प्रश्न विचारणारा एक वर्ग जगात निर्माण झाला. या वर्गाच्या हातात प्रसारमाध्यमं होती उद्योगधंदे होते. सूत्रधाराने बाहुल्यांना खेळवावं त्याप्रमाणे ह्या मंडळींनी गेल्या पंचवीस वर्षांत साऱ्या जगाचं एका भव्य 'मॉल'मध्ये रूपांतर केलं, जिथे पैसा बोलतो, मन मात्र मुकं राहतं. एकदा पैशानेच जगता येतं-पैशासाठीच जगायचं असतं, हाच जगण्याचा उददेश झाला, की मग शिक्षण पैशासाठीच होतं. सजणं धजणं प्रेम कलानिर्मिती श्रद्धा भक्ती मंदिरं यांचीही दुकानं होतात, मग दुकानातली भाषा खरेदीविक्रीचीच असते. तिथे 'संवाद' नसतो. असतो तो खरेदी-विक्रीचा व्यवहार

---